आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ मे २०२४ - बुधवार

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यातला प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. प्रचारासाठी केवळ दोन दिवसांचा कालावधी असताना सर्वपक्षीय नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ५७ जागांवर येत्या १ जून रोजी मतदान होत आहे. अखेरच्या टप्प्यात एकंदर ९०४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सध्या पश्चिमबंगालमधे प्रचार दौऱ्यावर असून त्यांनी आज मथुरापूरमधे सभा घेतली. ते आज ओदिशातही तीन प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे ओदिशात  प्रचारसभा घेत आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात देशातल्या आठ राज्यांत ५८ जागांवर मतदान झालं. या टप्प्यात मतदान करणाऱ्या मतदारांची आकडेवारी आयोगानं प्रसिद्ध केली असून, त्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत तीन टक्क्यांहून जास्त नोंदवल्याची माहिती निवडणूक आयोगानं काल जाहीर केली.

निवडणूक आयोगानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार या टप्प्यात ६४ पूर्णांक ९५ शतांश टक्के महिला मतदारांनी तर ६१ पूर्णांक ९५ शतांश टक्के पुरुष मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याशिवाय १८ पूर्णांक ६७ शतांश टक्के तृतीयपंथी मतदारांनी मतदान केलं.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी मुंबई शिक्षक मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने शिवाजीराव नलावडे यांना उमेदवारी दिली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब यांना आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून जे एम अभ्यंकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ७ जून आहे.

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत भारताचा जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ७ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ होणार आहे. तर एकूण उत्पन्न ८ टक्के वाढेल, असा अंदाज स्टेट बँक ऑफ इंडियाने काल जाहीर केलेल्या अहवालात व्यक्त केला आहे. देशाच्या ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात सातत्याने आर्थिक वाढ होत असल्याचंही या अहवालात म्हटलं आहे. प्रवासी वाहन विक्री, जीएसटी संकलन, क्रेडिट कार्डचा वापर, टोल संकलन यांचा शहरी भागातल्या आर्थिक वाढीत वाटा आहे. तर ग्रामीण भागात दुचाकी विक्री आणि पेट्रोलियम पदार्थांच्या वापराचा वाटा जास्त असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

शांतताप्रिय पुणे शहरात गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटना पाहता गृहखात्यानं पुण्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. या घटनांमुळे शांतताप्रिय पुण्याच्या प्रतिमेला तडा जात आहे, असंही सुळे यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे म्हटलं आहे. कल्याणीनगर अपघात प्रकरण, अंमली

पदार्थांची समस्या आणि वाढत्या गुन्हेगारीचा उल्लेख करून, पुण्यासारख्या महत्त्वाच्या शहराकडे गृहमंत्र्यांचं लक्ष नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

**<><><><><>**

नंदूरबार जिल्ह्यात शहादा तालुक्यात दोन ठिकाणी धडक कारवाईत कृषी विभागानं प्रतिबंधित बोगस बियाणं जप्त केलं. शहादा शहरासह तालुक्यातल्या अनरद इथं, प्रतिबंधित एच टी बी टी बोगस कापूस बियाण्यांची  छुप्या पद्धतीनं विक्री होत असल्याची माहीती कृषी विभागाला मिळाल्यानंतर, छापा टाकून ही कारवाई करण्यात आली. या दोन्ही कारवाईत वाहनासह जवळपास तीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

पालघर रेल्वे स्थानकात काल संध्याकाळी मालगाडीचे सहा डबे घसरून झालेल्या अपघातामुळे उपनगरीय रेल्वे सेवा अजूनही विस्कळीत आहे. रेल्वेरूळ दुरुस्तीचं काम युद्धपातळीवर सुरू असून, आज संध्याकाळपर्यंत या मार्गावरची रेल्वे वाहतूक सुरुळीत होईल,अशी माहिती पश्चिम रेल्वेचे विभागीय महासंचालक नीरज वर्मा यांनी दिली. या अपघाताची उच्चस्तरीय चौकशी चार सदस्यीय समिती स्थापन केल्याची माहितीही त्यांनी दिली.

प्रवाशांच्या सोयीसाठी म्हणून आज सकाळी मुंबईला जाणाऱ्या लांब पल्ल्यांच्या काही गाड्यांना डहाणू ते विरारपर्यंत सर्व स्थानकांवर थांबा दिला होता. काल संध्याकाळी पालघर स्थानकातून मुंबईच्या दिशेनं जाणाऱ्या मालगाडीचे सहा डबे रुळांवरून घसरून अपघात झाला होता.

**<><><><><>**

शेतीसाठी ड्रोन द्वारे फवारणी करण्याच्या तंत्रज्ञानाच्या माहितीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तसंच ड्रोन तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि वाव गो ग्रीन या कंपनीच्या संयुक्त विद्यमाने “ड्रोन तंत्रज्ञान आपल्या दारी” हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी अनेक गावांमध्ये ड्रोन फवारणी प्रात्यक्षिक तसंच खरीप पेरणीपूर्व मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

धाराशिव तहसील कार्यालयासमोर महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आज धरणं दिलं. पोलिस पाटील नूतनीकरण प्रकरणात उपविभागीय अधिकारी तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांविरोधात पोलिसांनी कोणतीही शहानिशा न करता बेकायदेशीरपणे गुन्हे दाखल केल्याच्या विरोधात हे आंदोलन करण्यात आलं. आंदोलकांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिलं असून त्यात ही कारवाई मागं घ्यावी आणि दोषी पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**//<><><><><>//**